BVBK-0402959

बा.वा.
२९५९
३।३।९४

# अमू आणि शेलू

मुलांसाठी सुंदर नव्या गोष्टी

भाग - २

सौ. वसुधा पाटील



म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. २९५९ दिनांक ३।३।९४
बा.वा.
BVBK-0402959


**प्रकाशक**
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
३१७, नारायण पेठ,
दै. प्रभातसमोर, पुणे ३०
फोन : ४५९५४१, निवास - ३३९६५२

**मुद्रक**
नाना जोशी
३१७, नारायण पेठ,
दै. प्रभातसमोर, पुणे ३०

**लेखिका** : सौ. वसुधा पाटील

प्रकाशन दिनांक : १० एप्रिल १९९३
मूल्य : १५ रु.

तीन पुस्तकांचा संच






२ ऱ्या भागातील कथांची यादी

६. अमू आणि मोर
७. अमू आणि चांदोबा
८. अमू आणि म्हातारी
९. अमूचं चित्र
१०. अमू आणि मासा
११. अमू आणि कोंबडे
१२. अमू आणि आनंद



त्याला सुरेख निळे निळे पंखआले. डोकीवर सुंदर तुरा आला. सर्वांत मजेची गोष्ट म्हणजे त्याचा रंगींबेरंगी- पिसाराही लांबलचक, सुंदर रंगांचे डोळे अंगभर घेऊन वाढला.



# ६. अमू आणि मोर

अमू एकदा टी.व्ही. बघत होती. बघता बघता टी.व्ही.वर मोरांचा नाच सुरु झाला. मोर काय सुंदर दिसत होते ! निळेनिळे मोर, त्यांचे पंख्यासारखे उघडलेले रंगीत रंगीत पिसारे, नाचता नाचता हलणारे डोक्यावरचे रंगीत रंगीत तुरे ! आहा ! फारच सुंदर ! अमूला काय आनंद झाला ते नाचणारे, डोलणारे मोर पाहून ! त्यांचा निळ्या-जांभळ्या पिसाऱ्यांवरचे ते हिरवट, पिवळे, केशरी, सोनेरी, डोळे पाहून तर ती एकदम बेहद्द खूष झाली. रंगांची उधळण तर खरंच मस्तच होती. अमूला तर मोरांचं वेडच लागलं. तिने त्याच्या मागे लकडाच लावला, मला एक मोर आणा, मला मोर पाहिजे म्हणून. पण बाबा कुठून मोर आणणार ?

जंगलातही मोर नव्हते - बर बाजारांतही विकत मिळण्यासारखे नव्हते.

राजस्थानात रोशनी नावाची अमूची एक पत्राने जोडलेली मैत्रीण होती. म्हणजे त्या दोघींनी एकमेकींना पत्र पाठवून मैत्री केली होती. एकमेकींना आपले फोटो पाठवले होते - पण एकमेकींना अजून बघितलं नव्हतं - भेटल्याच नव्हत्या त्या कधीं - फक्त पत्रातून मैत्री. अमूने रोशनीला पत्र पाठवून आपल्यासाठी मोराची चित्रं, मोराचे फोटो, आणि मोराचं एक लांबलचक पीस पाठवून द्यायला सांगितले. एक दिवस पोष्टमन तिच्या नावाचं एक पार्सल घेऊन आला. अमूने आश्चर्याने ते फोडून बघितलं तर आंत मोराची खूप चित्रं, फोटो आण सुंदर मोरपिसांचा पंखा ! आहा ! अमू तो पंखा घेऊन घरभर नाचली. शाळेतल्या सर्व मुलांना तो रंगबिरंगी पंखा तिने दाखवला - कुण्णाकडे तसा पंखा नव्हता. अमू अगदी हरकून केली.

एके दिवशी एक गृहस्थ अमूच्या घरी आले. अमूच्या आईने त्यांचा व्यवस्थित आदर-सत्कार केला. त्यांनी सगळी चौकशी केली. ते म्हणाले, "मी रोशनीचा काका. इथं कामासाठी निघालो होतो, तर रोशनीनें मला मुद्दाम अमृताला भेटायला सांगितलं. अमृतासाठी तिने ही भेट पाठवलीय. मुद्दाम वेळात वेळ काढून ही भेट द्यायला आलोय." त्यांनी एक पिंजरा पुढे केला. ओऽहो ! आत एक मोराचं छोटसं पिल्लू होतं. त्याला अजून पिसारासुद्धा फुटलेला नव्हता. अजून त्याला निळ्या निळ्या रंगाचे पंख सुद्धा व्यवस्थित फुटले नव्हते. डोक्यावर मोठा तुराही नव्हता. तरी अमूला ते पिल्लू आवडलं. तिने पिल्लाची, त्याच्या खाण्यापिण्याची सगळी चौकशी केली. रोशनीचे काका म्हणाले, "हे मोराचं पिल्लू आहे. अगदी छोटं आहे. रोशनीने तुला दिलंय. एक छोटसं पुस्तक दिलंय - त्यात या पिल्लाला काय खाऊपिऊ घालायचं, त्याची कशी निगा राखायची, त्याला कसं व्यवस्थित सांभाळायचं , कसं मोठं

करायचं, त्याबद्दल सर्व काही लिहिलंय, ते तू नीट वाच आणि त्याप्रमाणे कर. हे मोठं होईल तसं त्याला तुरा येईल, मोठा पिसारा फुटेल. त्याला भरगच्च निळेनिळे पंख येतील. मग पाऊस पडायला की तो तुझ्या अंगणात मस्त नाचेल."

अमूचा आनंद आभाळात मावेना. तिने रोशनीसाठी जंगलांत सापडलेली रंगीबेरंगी पक्ष्यांची पिसं, गोळा केलेले रंगीबिरंगी दगड आणि छान छान आकाराच्या लाकडी ढलप्या भेट म्हणून रोशनीच्या काकांजवळ दिल्या. काका सर्वांचा निरोप घेऊन गेले. आणि अमूने रोशनीचे पत्र आणि ते छोटसं पुस्तक वाचायला घेतलं. आता अतिशय काळजी घेऊन ते इवलंसं पिल्लू वाढवायचं होतं ना !

मग अमूने पिल्लाला वाढवायची सगळी जबाबदारी आपल्यावर घेतली. शाळा, शाळेचा अभ्यास करून, घरकामात आईला मदत करून उरलेल्या सर्व वेळात ती त्या पिल्लाच्याच भोवती फिरत राहिली. त्याची सगळी काळजी घेऊन तिने त्याला लहानाचं मोठं केलं. वर्षभरात पिल्लू चांगलंच वाढलं. त्याला सुरेख निळे निळे पंख आले. डोकीवर सुंदर तुरा आला. सर्वांत मजेची गोष्ट म्हणजे त्याचा रंगीबेरंगी पिसाराही लांबलचक, सुंदर रंगांचे डोळे अंगभर घेऊन वाढला. मोर अगदी डौलदार झाला होता. बागेत तो ऐटीत फिरे. त्याचे पाय केवढे मोठे आणि मजबूत झाले होते ? अमू शाळेतून आली की तो घरात, अंगणात, तिच्या भोवती भोवती नाचे नि फिरे ! तिच्या गळयात, मांडीवर मान ठेवून बसे. तासनतास तिच्या बरोबर बोलत राही. कधी तो अंगणात आपली पिसे टाके. अमू ती गोळा करी. तिने त्याचा एक गुच्छ करून निळया रंगाच्या काचेच्या जारमध्ये ठेवला होता. आलेल्या - गेलेल्या माणसांना तो फ्लॉवर पॉट फार आवडे. कधी कधी अमू एकेक पीस आपल्या शाळेतल्या मित्र-मैत्रिणींना नेऊन देई. प्रत्येकजण या सुंदर भेटीने बेहद्द

खूप होऊन जाई. एक मात्र होतं ! मोराचा आवाज मात्र कर्कश होता. तो ओरडायला लागला की सर्वजण नाक मुरडीत, कानांत बोटं घालीत, पण अमूला तो आवडे. कारण तो आता तिचा सर्वांत आवडता दोस्त होता ना ! तिला माहीत होतं की तो बिचारा एकटा आहे. आपल्याशिवाय त्याला जवळंच असं कुणी नाही. बिचाऱ्याचे आईवडील, भावंडं लांब तिकडे राजस्थानात ! किती त्याला दुःख होत असेल ? म्हणून ती त्याचे खूप लाड करी. त्याचं खूप कौतुक करी. या मोराच्या नादापायी इतर दोस्तांकडे अमूचं थोडं दुर्लक्ष होत होतं. म्हणून ससे, हरण, पोपट, खार, साळुंक्या, चिमण्या मोरावर राग धरून होत्या. त्याचा हेवाच ती करीत असत. तो ओरडायला लागला की त्याच्या आवाजाला कुजकटपणे हसत. आपापसात त्याला नावं ठेवीत. बिचाऱ्या मोराशी एक कोण बोलत असेल तर शप्पथ ! सर्वांनी जवळ जवळ त्याला वाळीतच टाकला होता जसा.

एक दिवस खारीने एक मोठा नाग अंगणातून वळवळत जाताना बघितला. खार घाबरून लगेच अमूला म्हणाली, "अमू, गवतातून, पाला-पोचोळ्यातून तू एकटीच फिरत असतेस. जरा सांभाळून राहा ग बाई. आज मी एक मोठा नाग अंगणातून जाताना बघितला. साप काही चांगला नसतो. त्याच्यावर अजिबात विश्वास ठेवू नये. भारी दुष्ट असतो. नाही तर तू आपली तुझ्या नेहेमीच्या स्वभावाप्रमाणे त्याला घरात नेशील, खाऊपिऊ घालशील, त्याच्याशी मैत्री करायला जाशील, तर सांभाळ हं ! सापाचा नेम नाही. तुझ्या घरी खाऊन-पिऊन पुन्हा उलटा तुला दंश करील वा चावेल. मग तुझी खैर नाही."


"पण त्याने का म्हणून दंश करावा ? मी काय त्याच वाईट केलंय ? इथली सर्व जनावरे, पक्षी, प्राणी माझ्याशी दोस्ती करतात. मग यानेच का माझ्याशी वैर धरावं ?" अमूने विचारलं.

"साप फार वाईट असतात. जराशी जरी हालचाल केली की त्यांना वाटतं समोरचा माणूस आपल्याला ठार मारणार. मग आधीच स्वतःच्या रक्षणासाठी तो पलटी खातो आणि डसतो. त्याचं विष रक्तात उतरलं की आपल्याला मरायलाच होतं. मी तुला आधीच सूचना देऊन ठेवते - सांभाळून राहा." खार म्हणाली आणि पेरूणीवर जाऊन बसली.

संध्याकाळी अमूचे बाबा घरी आले आणि अमूने त्यांना सापाबद्दल सांगितलं. बाबांनी सापाचा अंगणात, बागेत, परसदारात, घरात सगळीकडे शोध घेतला. त्याने कुठे बीळ वगैरे केलंय काय तेही बघितलं. कोठेही साप किंवा साप असल्याची खूण दिसली नाही. मग ते निर्धास्त झाले. अमूला म्हणाले, "अमू सोन्या, तू कसली काळजी करू नकोस हां ! आपण दारं-खिडक्या गच्च बंद करून घेऊ. म्हणजे रात्री निवांतपणे झोपायलां बरं. बाहेर कुठे झाडाझुडपात साप असलाच तरी त्याला आत येऊ न दिलं म्हणजे झालं. खारीला दिसला असेल एखादा साप, पण साप कधी एका जागी राहत नाही. निघून गेला असेल तो कुठेतरी. एवढ्या मोठ्या जंगलात साप असणारच. आपण काळजी घेतली म्हणजे झालं. तू मुळीच घाबरू नकोस. तुला भीती वाटतेय का? तर वर आमच्याकडे झोपायला चल."

अमूही काही भित्री नव्हतीच. ती चांगलीच धीट होती. तिला रात्रीची, काळोखाची, जनावरांची, भूताखेतांची मुळीच भीती वाटत नव्हती. ती म्हणाली, "नाही बाबा, मी खाली माझ्या खोलीतच झोपेन. मला नाही त्या सापाची भीती वाटत."

मग खिडक्या-दारं बंद करून आईबाबा वर झोपायला गेले. अमूही खाली आपल्या खोलीत झोपली. बऱ्याच वेळाने तिला आठवलं की, मोराला बरं नसल्याने सकाळपासून त्याने काहीही खाल्लेलं नाही आणि पेरूणीच्या झाडाखाली त्याने जो मुक्काम ठोकला होता, तिथून एकदाही



शाळा, शाळेचा अभ्यास करून, घरकामात आईला मदत करून उरलेल्या सर्व वेळात ती त्या पिल्लाच्याच भोवती फिरत राहिली. त्याची सगळी काळजी घेऊन तिने त्याला लहानाचं मोठं केलं.



हललेला नाही. त्याची चौकशी करायला हवी. त्याला काहीतरी आवडेल असं हलकसं खाणं दिलं पाहिजे. या सापाच्या भानगडीत त्याला बिचाऱ्याला आपण साफच विसरून गेलो.

मग ती घाईघाई करून स्वयंपाकघरात गेली. थोडसं खाणं वाडग्यात घेऊन तिने बाहेरचा दरवाजा उघडला आणि अंगण पार करून पेरूणीजवळ आली. इतक्यात तिच्या पायाखाली काहीतरी मऊमऊ, गुळगुळीत, नरमनरम असं आलं आणि लगेच "हिस्सऽ हिस्सऽ हिस्स" असा मोठ्यांदा आवाजही आला. आणि दुसऱ्याच क्षणाला ते लांबलचक, भयानक जनावर, फणा वर काढून फुलवीत, ताठच्या ताठ तिच्यासमोर उभं राहिलं. त्याने आपलं तोंड उघडलं होतं आणि जिभली बाहेर काढून त्याने पुन्हा 'हिस्सऽहिस्सऽहिस्स' केलं. अमू घाबरली खरी, पण धिटाईने चपळाई करून तिने त्या जनावराचा गळा गच्च पकडून ठेवला. ते जनावर म्हणजे सकाळचा नागच होता. त्यानेही झटकन् अमूच्या हाताला आपल्या रबरासारख्या लवचिक अंगाने विळखा घातला. अगदी घट्ट ! आणि हळूहळू अंग आवळायला सुरुवात केली. इतके घट्ट, इतकं घट्ट आवळलं की अमू बिचारी मोठ्याने रडायला लागली - किंचाळायला लागली. आईबाबांनी अमूची किंकाळी ऐकून झपकन खाली धाव घेतली. पण ते पोहोचायच्या अगोदरच मोराने सापाच्या अंगावर पहिली झडप घेतली. अमूने सापाचं मानगूट अजून सोडलं नव्हतं. मोराने सापाच्या अंगावर जिकडे तिकडे चोच खुपसायला सुरुवात केली, का की त्याने अमूचा हाताभोवतालचा घट्ट विळखा प्रथम सैल सोडावा. जखमा व्हायला लागल्याबरोबर सापाने विळखा सोडला. त्याबरोबर अमूने त्याला जोराने खाली आदळला. मग लढाई सुरी झाली - मोराची आणि नागाची ! साप मोराला चावायला बघत होता, पण त्या आधीच मोर त्याच्या मानेवर चोच मारून त्याला जखमी करीत होता.

जागोजाग चोची मारून मारून सापाला त्याने अगदी हैराण केलं - रक्तबंबाळ करून सोडलं. सापाची ताकद संपली तशी पायाखाली गच्च पकडून चोचीने त्याच्या डोक्याची नुसती जाळी करून टाकली. अगदी चांदण्याच्या प्रकाशात ही महाभयंकर लढाई चालली होती. झाडांवरच्या पक्ष्यांनी, खारीने, अमूने, अमूच्या आईवडिलांनी अगदी डोळे मोठे मोठे करून ती पाहिली. अखेर साप जेव्हा जखमी होऊन जमिनीवर वळवळत निपचित पडला तेव्हा कुठे ती लढाई संपली. मोरालासुद्धा एकदा-दोनदा तो साप डसला होताच. पण त्याने आटोकाट प्रयत्न करून सापाला मारलं होतं आणि अमूचा जीव वाचवला होता. आता मात्र तो स्वःच बेशुद्ध व्हायला लागला. एकदम निपचित पडला कारण सापाचं विष महाभयंकर असतं. ते रक्तात शिरलं की माणूस काय, जनावर काय, कुणीसुद्धा वाचूच शकत नाही. अमूच्या बाबांनी ताबडतोब मोराला उचललं, आपल्या जीपमध्ये टाकलं आणि जीप भरधाव सोडून गावातल्या पशुवैद्याकडे आणलं. त्यांच्याकडे सापाचं विष उतरविण्याची औषधं, इंजेक्शन्स असतात. डॉक्टरांनी लगेच मोराला सापाचे विषाविरुद्ध असलेली इंजक्शनं दिली. चोचीतून कसली तरी औषधं तोंडात घुसवली. शिवाय जखमांना औषधं लावून मलमपट्ट्या करून टाकल्या. आठवड्यात मोर चांगला खडखडीत बरा झाला. त्याला घेऊ जीपमधून जेव्हा बाबा घरी आले तेव्हा त्याचं काय जोरात स्वागत झालं ! जसा काही एखादा शूर, पराक्रमी जवानच विजयी होऊन परत घरी आलाय ! सगळे पक्षी, खार, ससे, हरण, एकत्र जमा झाले होते. मोराला पाहताच सगळ्यांनी मोठ्यांदा जयजयकार केला. प्रत्येकाने समोर येऊन त्याची स्तुती केली, त्याची वाहव्वा केली, त्याच्या धिटाईचं, पराक्रमाचं खूप म्हणजे खूपच वर्णन केलं. खरोखरच म्हणतात ना, अडचणींत वा संकटांत जो मदत करतो तोच खरा मित्र असतो. मोर

अमूचा खरा मित्र होता. आपल्या जिवाची पर्वा न करता अमूला वाचविणासाठी तो एकटा सापाशी लढला. स्वतः जखमी झाला पण सापाला मारून त्याने अमूला सुरक्षित ठेवलं होतं. आता सर्वांनी त्याच्याशी दोस्ती केली होती. सर्वांनी केलेल्या कौतुकामुळे अमूने जवळ घेऊन घेतलेल्या पाप्यांमुळे आणि अमूच्या आईबाबांनी केलेल्या अभिनंदनामुळे मोर एकदम खूष झाला. त्याचं मन आनंदाने भरून गेलं आणि आकाशात ढग नसतानाही, पाऊस पडत नसतानाही तो एकदम नाचायला लागला - पिसारा फुलवून अंगणभर डौलात नाचायला लागला. तसे सगळे आनंदाने गाऊ लागले.

* * *



"हिस्सऽ हिस्सऽहिस्स" असा मोठ्यादा आवाजही आला. आणि दुसऱ्याच क्षणाला ते लांबलचक, भयानक जनावर फणा वर काढून फुलवीत



## ७ . अमू आणि चांदोबा

एकदा रात्री अमू आपल्या खोलीत झोपली असताना लांबून वाघ डरकाळया फोडताना तिने ऐकले. एकच वाघ नव्हता. चांगले दोन-तीन असावेत. तिघेही जोरजोराने भांडत असावेत. अमूला त्यांचं भांडण विचित्र वाटलं. ती मनात खूप घाबरली. पांघरूण घेऊन हळूच उठली आणि माडीवर येऊन हळूच आईवडिलांजवळ जाऊन झोपली. पण तिला झोपच आली नाही. डोळे आपले सताड उघडे राहिले. काही वेळाने पौर्णिमेचा हसरा चांदोबा खिडकीत दिसायला लागला. अमू त्याच्याकडे बघत राहिली, तर तो तिच्याशी हसल्यासारखा वाटला. अमूही त्याच्याबरोबर हसली.



मग वर उंच आभाळात गेल्याबरोबर अमू चांदोबाबरोबर खूप खूप खेळली. चांदोबाला अमूबरोबर हसायला, खिदळायला खूप आवडलं. हातात हात घालून दोघं आभाळभर फिरले,

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९५९ दिनांक ३/१३/७
विषय गो. ना. क्र. ........



"अमूराणी, तुला झोप येत नाही ना? मग तू इथं आकाशात माझ्याबरोबर खेळायला ये ना? तू किती गुणी आणि सुंदर मुलगी आहेस? मी इथून नेहमी बघतो ना तुला! मला तू फार आवडतेस." अमूला चांदोबा आपल्याशी बोलल्यासारखा वाटला. तिला खूप आश्चर्य वाटलं. आपल्याला कसं त्याच्याबरोबर खेळायला आकाशात जाता येईल? ती विचारात पडली. चांदोबा पुन्हा हसला. म्हणाला, "काळजी करू नकोस, अमू! तू नुसती खिडकीशी येऊन उभी राहा. बस्स! मी तुला येण्यासाठी माझ्या किरणांची शिडी पाठवतो. तू नुसतं एक पाऊल ठेव तिच्यावर आणि नुसते डोळे मीट की तू वर आभाळात माझ्याकडे आलीस म्हणून समज."

"पण मी माझं घर सोडून तुझ्याकडे कशी येऊ, चांदोबा? तुझ्याशिवाय दुसरं कुणीही मला आभाळात दिसत नाही. एक चांदणी देखील नाही. आणि मी एकदा वर आले की परत कशी माघारी येणार? माझ्या आईबाबांना मी हवीय. माझ्या चित्रातल्या घोड्यांना मी हवीय. इथल्या माझ्या सगळ्या सोबत्यांनाही मी हवीय. मी त्यांच्याबरोबर नेहेमी राहणार असं त्यांना वचन दिलंय. सर्वजण माझी वाट पाहतील ना?" अमू म्हणाली.

"सोनुले, तू ये माझ्याशी खेळायला. परत जाण्याची काळजी करू नकोस. पहाटे सूर्य उगवला की लगेच मी तुला खाली पाठवीन. माझ्यावर विश्वास ठेव." चंद्र म्हणाला आणि त्याने आपल्या किरणांची सोनेरी झगझगती शिडी हळूच खाली सोडून दिली. तिने तिच्यावर एक पाऊल ठेवलं आणि नुसते डोळे मिटले. बस्स! लागली अमू हळूहळू वर आभाळात जायला. वाटेत काही ढग भेटले. अमूला बघून म्हणाले, "आमच्या बरोबरही खेळ की थोडा वेळ आपण मजा मजा करू."

"परत मी येईन ना, तेव्हा तुमच्याबरोबरही खेळेन हं! आता मी

चांदोबाकडे चाललेय !" अमू म्हणाली आणि आणखी वरवर गेली.

"जरूर जरूर ये. आम्ही तुझी वाट पाहतो हं ! अमू, अग ये तर खरी आमच्यात, बघ आम्ही तुला सुंदर इंद्रधनुष्य आमची भेट म्हणून देऊ. आवडेल ना तुला ते ?" ढग म्हणाले.

"होऽऽ ! खूपखूप आवडेल" वर जाता जाता अमू म्हणाली.

मग वर उंच आभाळात गेल्याबरोबर अमू चांदोबाबरोबर खूप खूप खेळली. चांदोबाला अमूबरोबर हसायला, खिदळायला खूप आवडलं. हातात हात घालून दोघं आभाळभर फिरले, धावले. तेव्हा आभाळातलं चांदणं खूपच चकाकायला लागलं. कारण चांदोबा अगदी खूष झाला होता ना ! हळूहळू रात्र संपत आली आणि पूर्वेकडे गुलाबी गुलाबी, लालसर लालसर प्रकाश दिसायला लागल्याबरोबर अमू म्हणाली, "चांदोबा, आता मी घरी जाऊ ? आईबाबा म्हणतील कुठं गेली आमची अमू ? ते जागे व्हायच्या आत मला खाली गेलं पाहिजे ना ?"

चांदोबा हसून म्हणाला, "अमूराणी, डोळे मीट." अमूने डोळे मिटले. एका क्षणात ती आपल्या बिछान्यावर येऊन झोपलीसुद्धा. हे सगळं स्वप्न होतं का ? अमूला आश्चर्यच वाटत होतं. पण नाही. ते स्वप्न नव्हतं. अमूच्या कपड्यावर चांदण्यांचे बारीक तंतू पसरले होते आणि सर्व अंगावर, केसांवर बारीक बारीक सोनेरी कण झगमगत होते.

आईने विचारलं, "अमू, अग हे काय आहे ? कुठं जाऊन आलीस सकाळी सकाळी ?" अमूने तिला चांदोबाची सर्व हकीगत सांगितली. आईला ती खरीच वाटली नाही. ती म्हणाली, "अमू ग, कुणाला हे असलं काही सांगू नकोस बरं ! कोणी तुझ्यावर विश्वास ठेवणार नाही. सगळे हसतील तुला."

"का म्हणून हसतील ? मी खोटं थोडंच सांगतेय ? कितीतरी विचित्र विचित्र गोष्टी जगात घडतात. हो की नाही ? आपण त्या खऱ्या मानतोच

ना ! आपल्या चित्राच्या फ्रेममधल्या छगन, मगन, सजनचीच गोष्ट घे की. तिघेही छोटे होऊन फ्रेममध्ये राहतात, हवं तेव्हा मोठे होऊन बाहेर येतात. कुणाचा विश्वास बसेल यावर? अग आई, खरंच मी चांदोबाबरोबर खेळून आलेय. स्वप्न नाही हं हे ! अगदी खरीखरी गोष्ट आहे बघ." आई बघतच राहिली. कारण सूर्याच्या प्रकाशात त्या तंतूमुळे आणि त्या सोनेरी चकाकत्या कणांमुळे खरंच अमू नुसती चमचमत होती.

दहा-बारा दिवस गेले. पुन्हा चांदोबाने अमूला खेळायला बोलावलं. आणि अमू त्याच्या किरणांच्या शिडीवरून पुन्हा आभाळात गेली. यावेळी चांदोबा खूपच रोडावला होता. आणि त्याच्याबरोबर शेकडो लुकलुकणाऱ्या, चमचमणाऱ्या चांदण्या होत्या. सर्वजण मिळून खूपखूप खेळले. चिक्कार मज्जा मज्जा केली. पहाटेला सूर्य उगवण्याच्या सुमारास अमू चांदोबाला सांगून आपल्या घरी परतली. यावेळी तिच्या कपड्यांवर, केसांवर सगळीकडे छोट्या छोट्या लुकलुकत्या चांदण्या चमचम करीत होत्या. पुन्हा आईला आश्चर्य वाटलं ! बाबांनीही तिला पुन्हा पुन्हा चांदण्याबद्दल विचारलं. अमूने सगळं काही छानपैकी वर्णन करून सांगितलं. मग बाबा घाबरले. म्हणाले, "अमू बाळा, पुनः पुन्हा आभाळात जाऊ नकोस ग ! हरवलीस तर मग ? आम्हाला तुझ्याशिवाय दुसरं कोण आहे का ?" अमू खुदकन् हसली. बस्स.

पुन्हा दहा-बारा दिवस गेले. चांदोबा पुन्हा वाटोळा व्हायला लागला होता. खिडकीत येऊन पुन्हा अमुला म्हणाला, "अमू राणी, येतेस ना ? तुझ्याशिवाय चैन पडत नाही ग"अमूने चेहरा टाकला. म्हणाली, "बाबा जाऊ नको म्हणताहेत ना. मग मी कशी येऊ ?"

"अग, आता हे मी तुला शेवटचं बोलावतोय. तुझ्या आईबाबांना आवडत नाही ना ? मग नको येऊस तर पुढे कधी. पण आजच्या खेपेला ये." चांदोबाने काकुळतीला येऊन विचारलं. अमूचे बाबा हे सर्व ऐकत

होते. त्यांनी या खेपेला आभाळात चांदोबाकडे जायला अमूला परवानगी दिली. अमूला खूप आनंदही झाला आणि वाईटही वाटलं. कारण ही आता तिची शेवटची खेप होती आभाळातली. अमू पुन्हा चांदोबाच्या किरणांच्या शिडीवरून वर गेली. यावेळेलाही दोघं जण खूप खेळ्ली. नाचली व गाणी म्हटली दोघांनी. परत येताना यावेळी चांदोबाने तिला सगळे चांदण्या बसवलेले झगमगते दागिने भेट दिले. गळ्यात हार, कानात डूल, डोळ्यावर सुंदर मुकूट, कंबरपट्टा, बांगड्या, अंगठी... काय नि किती ! खूपच दागिने दिले. अमू ते घालून निघाली. वाटेत ढगांनी तिला अडवलं. म्हणाले, "अमू, तू आमच्याबरोबर पण खेळणार होतीस ना? दोनदा चांदोबाकडे आलीस पण आमच्याकडे आली नाहीस ! चल, आपण आता खेळू या." मग अमू ढगांबरोबरही खेळ्ली, हसली, नाचली. मग ती खूप दमली. म्हणाली, "मी जाऊ आता माझ्या घरी ?" आईबाबा वाट पाहत असतील. मी फार दमलेय." मग ढगांचा निरोप घेऊनं ती निघाली. ढगांनी तिला आपली भेट म्हणून सप्तरंगी इंद्रधनुष्य दिलं. ढग आणि चांदोबा एकदमच म्हणाले, "अमू छकुले, आमची आठवण ठेव. कंटाळा आला की अधूनमधून अशीच येत जा आमच्याबरोबर खेळायला. आम्हाला तू खूप आवडतेस. तेव्हा आम्हाला विसरू नकोस." अमूला खूप वाईट वाटलं. ती रडत रडत खाली उतरली. घरात शिरल्याबरोबर अंधार होता तरी घरभर अगदी लख्ख, सोनेरी, चमचमता प्रकाश पडला. कारण चांदोबाने अमूला दिलेले दागिने नुसते लख्लख् करीत होते. दिव्यांची काहीही जरूरी नव्हती. आणि सगळं घर सुगंधी सात रंगांनी सुरेख रंगवलेलं दिसलं. रंगही चकाकत होते. सगळं घर राजवाड्यासारखं सुंदर दिसत होतं. अमूचे आईबाबा आश्चर्यचकित होऊन अमूकडे आणि घराकडे वेड्यासारखे बघतच राहिले. कारण त्यांनी काही घरात दिवे लावले

नव्हते. आणि घर रंगवलंही नव्हतं. बाबांनी सगळी जादू बरोबर ओळखली. ही नवी नवलाई चांदोबाची आणि ढगांची भेट होती. त्यांच्या लाडक्या अमूला दिलेली. मग बाबांनी अमूला पटकन् उचलून घेतली आणि तिचे मटामट मटामट पापे घेतले. चांदोबा आणि ढग ही सगळी गंमत बघतच होते. त्यांनीही हसून मग आनंदाने टाळ्या वाजवल्या.


* * *





## ८. अमू आणि म्हातारी

ती एक अगदी हडकुळी, हाड न् हाड दिसणारी, अंगावर सुरकुत्या सुरकुत्या असलेली, गरीब बिचारी म्हातारी होती. तिच्या बोळक्यात दातच नव्हते. तिला म्हातारपणामुळे नीटसं दिसतही नव्हतं. तरी तिच्या नाकावर चष्मा काही नव्हता. तिच्या पाठीची वाकून वाकून नुसती कमान झाली होती. खूप म्हणजे खूपच अशक्त होती ती म्हातारी. छगनच्या पाठीवरून शाळेला जाताना एकदा अमूला ती दिसली. बरोबरच्या टोपल्यात, ती खाली वाकून झाडांच्या सुक्या काटक्या, लाकडाचे ढलपे, वेलांचे सुकलेले तुकडे वगैरे वगैरे काहीबाही उचलून मोठ्या कष्टाने पावले टाकीत होती. कडक थंडीचे दिवस होते. थंडीमुळे ती कुडकुडत



, लाकडाचे ढलपे,
वेलांचे सुकलेले तुकडे वगैरे वगैरे काहीबाही उचलून मोठ्या कष्टाने पावले टाकीत होती.



मग म्हातारी उठली आणि [illegible] चालू लागली

होती. अंगावर तर जुनेपाने फाटके कपडेच होते.

"आजीबाई, इतक्या कडाक्याच्या थंडीत तू या जंगलात उघड्यावर कशाला काम करतें आहेस? थंडी बाधणार नाही का तुला?" अमूने प्रेमळपणाने विचारले.

"अग माझ्या सोने, माझी काळजी घेणारं कोण आहे या जगात? मी एकटीच आहे ग छकुले! मला तर काम करायलाच पाहिजे- जगायचंय ना? आणि माझ्याजवळ तर एक नया पैसा देखील नाही. आता हा लाकुडफाटा जमविणार तेव्हा कुठे मी विस्तव पेटवणार. मग त्यावर काही तरी शिजवणार आणि खाणार. रात्री झोपताना ऊबेला हाच विस्तव कामी येणार. मला फार जड जातं बाई हे सारं काम करायला! पण करणार काय? कोण मदत करणार? मलाच एकटीला सगळं काही करायला हवं ना?" एवढं बोलतानाही म्हातारीला लागली धाप. ती जोरजोराने श्वास घ्यायला लागली.

अमूला तिची फार दया आली. म्हणाली, "आजीबाई, तू कुठे राहतेस? मला तुझा पत्ता दे. मी आईला विचारून तुझ्या घरी येईन आणि तुला आमच्या घरी घेऊन जाईन. माझे आईबाबा निदान या हिवाळ्यापुरती तरी तुझी चांगली सोय बघतील. तुझी सर्व काळजी घेतील."

म्हातारी हसली. म्हणाली, "अगबाई, माझा पत्ता! आता कुठला देऊ पत्ता तुला, मुली? मला नाही घर, नाही दार! मी कुठेही राहते. कधी पुलाखाली राहते तर कधी सार्वजनिक बागेत! कधी कधी फूटपाथवर पण राहते. मला एवढं प्रेमाने बोलावते आहेस तुझ्या घरी सोने, देव तुझं भलं करो."

मग अमूने आपलाच पत्ता दिला आणि कधीही आपल्या घरी राहायला यायचं आमंत्रण दिलं आणि ती शाळेला निघून गेली.

संध्याकाळ झाली. खूपच थंडी पडली. म्हातारीची शेकोटी थंड झाली. थोडंसं काहीतरी खाऊन, पोटाशी पाय घेऊन ती कुडकुडत बसली. तिला कुठला बिछाना आणि चादर आणि गरम पांघरूण वगैरे मिळायला? एक फाटकं कांबळं होतं, तेच ती अर्ध अंथरूण म्हणून वापरायची आणि अर्ध पांघरूण म्हणून वापरायची. बिचारीकडे स्वेटर-बिटर पण काही नव्हतं. थंडी तर अशी भयंकर की उघड्या फटीतून आत घुसून अंगाला चाकूच्या पात्यासारखी नुसती कापून काढायची... सबंध रात्र म्हातारीने थंडीने गारठून झोपेशिवाय काढली. सकाळ झाली. म्हातारीला राहवेना. ती मनात म्हणाली, "त्या छोटुकल्या बाहुलीने आपल्याला घरी बोलावलंय राहायला तर का जाऊ नये? बऱ्यापैकी खायला-प्यायला मिळेल, अंथरूण-पांघरूण मिळेल, कपडे मिळतील. हिवाळा तर तिच्याकडे काढू! मग पुढचं पुढे बघू! आपण काही फुकट राहायचं नाही. घरात भरपूर काम करू."

मग म्हातारी उठली आणि काठी घेऊन तुरुतुरू चालू लागली. जंगलाच्या वाटेने. जरा जंगलात घुसत नाही तर समोर येऊन उभा राहिला भला मोठा वाघ! जबडा उघडून गुरगुरत म्हणतो कसा, "म्हातारे, कुठे निघालीस? थांब. मला लागलीय भूक. तुला उभीच्या उभी खाऊन टाकतो."

म्हातारी घाबरली पण धीर गोळा करून म्हणाली, "अरे वेड्या, खाणार तर खुश्शाल खा. पण तुला मिळणार काय? नुसती माझी हाडं आणि कातडी! चालेल का तुला? एवढ्यानं भूक भागेल का तुझी? पण एक-दोन महिने थांबशील तर तुला माझ्या अंगाचं भरपूर मांस मिळेल. कारण मी चाललेय माझ्या लेकीकडे राहायला. दूध-तूप व रोटी खाईन, विश्रांती घेईन, गटरगुम होईल. मग तु मला खा."

वाघोबा फसले. त्यांनी तिला सोडून दिलं. गटरगुम म्हातारीचं चित्र

डोळ्यांपुढे आणीत जिभल्या चाटीत ते वेगळ्या वाटेने चालू लागले.

त्यानंतर जरा पुढे जाताच एक भला दांडगा सिंह भेटला. तोही गुरगुरत म्हणाला, "म्हातारे, थांब ! चाललीस कुठे ? रात्री मला एकही जनावर खायला मिळालं नाही. मी उपाशी आहे. बरी भेटलीस. आता मी तुलाच खातो."

म्हातारीने वाघासारखंच त्यालाही चकवलं. गोडगोड बोलून त्याला विचारात गुंगवलं आणि पुढे सटकली. मग भेटला एक लबाड कोल्हा ! त्याचाही म्हातारीवर सपाट्याने उडी टाकून तिला ठार मारण्याचा आणि खाण्याचाच बेत होता. पण वाघासारखे आणि सिंहासारखे तिने कोल्ह्यालाही चांगलंच गंडवलं. आणि ती तुरूतुरू पुढे निघाली. तिघांनाही वाटलं - "दोन महिन्यांनी तर म्हातारी याच वाटेने परत घरी जाणार, तेव्हा बरोब्बर पकडू आणि गटरगुम झालेल्या म्हातारीचा कधीच्या कधी चट्टामट्टा करून टाकू, तोवर वाट बघायला काय हरकत आहे ?

इकडे म्हातारी अमूच्या घरी पोहोचलीसुद्धा. तिची एकूण दशा आणि अवतार बघूनच अमूच्या आईला तिची फार फार दया आली. तिने तिला आपले जुने कपडे, गरम शाल, जुना स्वेटर आणि फरशीचा गारवा पायांना लागून सर्दी व खोकला होऊ नये म्हणून जुन्या सपाता काढून दिल्या. तिची झोपण्याची व्यवस्था अमूच्या सांगण्यावरून तिच्या खोलीतच केली. म्हातारी अगदी खूष झाली. पण तिने कधी आयतं बसून खाल्लं नाही. राहिली होती तितके दिवस रोज तिने अमूची वेणीफणी केली. स्वयंपाक करण्यात, घराची साफसफाई करण्यात ती सकाळपासून रात्रीपर्यंत खूप मदत करी. अमूला ती रात्री झोपताना तऱ्हेतऱ्हेच्या, रोजच निरनिराळ्या गोष्टी सांगे. अमूच्या घरची प्रेमळ आजीच ती बनून गेली. सर्वांना तिचा लळा लागला. तिची तब्येत छान



देवानेच मला तुमच्याकडे पाठवून इतकं सुख दिलं. इतकी चांगली माणसं भेटवली ! आता तुमचा जास्त फायदा घेणं बरे नव्हे. मला आता निघायलाच हवं.

सुधारून ती अगदी गुटरगुम झाली. होता होता दोन महिने होऊन गेले. हिवाळा संपला. एक दिवस म्हातारीने आपले कपडे, आपले सामान बांधून टाकले. आणि डोळ्यांत पाणी आणून म्हणाली,

"तुम्ही तिघंही मला फार आवडलात. मी कुणाची कोण पण मला घरात ठेवून घेऊन घरातल्याच माणसासारखं वागवलंत. किती तुमचे आभार मानू, बाबांनो ? देवानेच मला तुमच्याकडे पाठवून इतकं सुख दिलं. इतकी चांगली माणसं भेटवली ! आता तुमचा जास्त फायदा घेणं बरे नव्हे. मला आता निघायलाच हवं. तुम्हाला सोडून जायचं जिवावर येतंय माझ्या, पण जायला हे हवंच. तर निघते मी आता."

अमूला खूप वाईट वाटलं. ती रडायला लागली. मग अमूचे बाबा म्हणाले, "राहा तुम्ही आमच्याचकडे आजीबाई ! अगदी शेवटपर्यंत राहिलात तरी चालेल. आमचं काही म्हणणं नाही. अमूला आजी मिळेल. आम्हालाही तुमची सोबत होईल. तुमचा आम्हाला काही त्रास नाही नि कसलं ओझं नाही. अगदी मजेत राहा."

पण म्हातारी कबूल झाली नाही. म्हणाली, "जंगलात ते तिघे राक्षस माझी वाट बघत असतील ना ! मी त्यांना कबूल केलंय दोन महिन्यांनी परत येईन म्हणून. आता जर का मी गेले नाही तर... तर... ते तिघंही इथवर येतील मला शोधायला. आणि तुम्हाला विनाकारण त्रास देतील सारखा सारखा. मला ते नकोय. मला माझी ही छकुली अगदी सुखात, आनंदात, आरामात राहायला हवीय. हो ना, सोनुकले ?"

अमूने मग त्या राक्षसांची चौकशी केली. तर ते निघाले जंगलातले वाघ, सिंह आणि कोल्हा ! म्हातारीने, तिघे काय काय म्हणाले नि आपण त्यांना काय कबूल केलंय, ते सर्व सांगितलं.

बाबा म्हणाले, "आजीबाई, मी तुम्हाला माझ्या जीपमधून घरी सोडतो आणि जर का ते मध्येच आपल्याला भेटले आणि अंगावर चालून

आले तर मी सरळ त्यांना गोळ्या घालेन. तुम्ही काहीही घाबरू नका."

"नको रे बाबा, माझ्या मुला, तसं काही करू नकोस. 'प्राणी मारायचे नाहीत' हा तुमचा कायदा आहे ना? आणि तू तर जंगलातला मोठ्ठा अधिकारी ! आणि तूच तो कायदा मोडणार? आणि कुणासाठी? तर माझ्यासारख्या म्हातारीसाठी? अरे, माझ्या सोन्या, तुला माझ्यासाठी शिक्षा-बिक्षा नको रे व्हायला. माझ्याबरोबर तुम्ही कोणीही येऊ नका. मी एकटी जाईन आणि काय करायचं ते बघेन. मी व्यवस्थित त्यांना तोंड देईन. तुम्ही काही काळजी करू नका" असं म्हणून म्हातारी निघाली.

मग अमूला एक छानशी कल्पना सुचली. ती परसदारच्या बागेत गेली. आणि तिथून वेलावरचा एक मोठा डांगर भोपळा घेऊन आली. सुरीने व्यवस्थित कापून तिने भोपळ्याला खाली म्हातारीचे दोन्ही पाय जातील एवढी मोठी गोल भोकं ठेवली. हात बाहेर पडतील अशी दोन बाजूला दोन भोकं ठेवली. डोकं बाहेर राहावं म्हणून वरच्या बाजूलाही एक मानेभोवती गोल गोल भोक कापून ठेवलं. मग म्हणाली, "आजी ग, तू या भोपळ्यात बसून जा ! म्हणजे कुणाला दिसणार नाहीस. दिसलीस तरी कुणाला ओळखता येणार नाही. भरभर भरभर चाल म्हणजे झालं." म्हातारीला अमूचं खूप कौतुक वाटलं. ती अगदी मजेत भोपळ्यात, भोकातून हात-पाय बाहेर काढून बसली. मग अमूने डांगराचे जे तीन तुकडे केले होते ते व्यवस्थित फेविकॉल आणि गमटेपने म्हातारीच्या अंगाभोवती घट्ट चिकटवून टाकले. शिवाय एक नायलॉनची बारीक दोरी देखील भोवती गच्च बांधून ठेवली. अमूच्या आईबाबांनी तीन-चार दिवस पुरतील एवढे खाण्याचे पदार्थ आणि थोडेसे पैसे घालून एक पिशवी दिली. म्हातारीने आपलं सामान उचललं आणि म्हणाली,

शाखा.
२९५९ ३१३१९८

“चल रे भोपळ्या टुणुक टुणुक,
दाखव तुझी चुणुक चुणुक !
घेऊन चल, माझ्या घरी,
देईन तुला, तूप, भाकरी !
तिघांशी त्या लढशील का ?
म्हाताऱ्या आजीला वाचवशील का ?
तू तर बाबा शूर जवान -
तुझ्याच हाती माझी मान !”

म्हातारी तुरुतुरु निघाली. सर्वांनी हात हलवून तिला निरोप दिला. वाघ, सिंह आणि कोल्हा, तिघंही म्हातारीची वाट बघत जंगलात ठाण मांडून बसलेच होते. त्यांना बघून म्हातारी झाडांचा आडोसा घेत घेत पुढे पुढे पळू लागली. वाघ आणि सिंह तसे साधे नि भोळेच. त्यांच्या लक्षात काही म्हातारी पळाल्याचे आलेच नाही. पण कोल्हा भारी लबाड ! दुरून डांगर भोपळा पळताना बघून त्याच्या मनात शंका आलीच.

“अरे, तुम्ही बघितलंत का तो लाल डांगर भोपळा तुरूतुरू पळतोय ते ! डांगर तर निर्जीव असतो. त्याला कुठले हातपाय फुटायला ? आणि तो पळेल कसा ? काहीतरी गफलत दिसतेय. चला आपण पाठलाग करून त्याला पकडू. नक्कीच, अगदी नक्कीच काहीतरी भानगड आहे.”

तिघेही भोपळ्याच्या मागे धावत सुटले. दोन मिनिटात त्यांनी भोपळ्याला पकडलं. तिघांनीही त्याला घेरलं आणि लगेच त्यांना कळलं की भोपळ्यात बसून गटरगुम झालेली म्हातारीच गुपचुप पळतेय.

“अग लबाडे, आम्हाला फसवायला बघतेस काय ? आमच्या नकळत पळून जात होतीस काय ? पण आम्ही बरे तुला तशी सोडू ? बरी गटरगुम झाली आहेस ग ? या डांगर भोपळ्यासारखीच फुगली आहेस की लेकीच्या घरी राहून ! छान, आता आमची चंगळच चंगळ.



मला घरात ठेवून घेऊन घरातल्याच माणसासारखं वागवलंत. किती तुमचे आभार मानू आबांनो ?


आहे. तुला मारलं की भरपूर मांस मिळेल आम्हाला. दोन-तीन दिवस मग काही खायला नाही मिळालं तरी चालेलं आता. ये पुढे अशी. अस्से लचके तोडतो की बस्स !" जिभल्या चाटीत कोल्हा म्हणाला, वाघ आणि सिंहही पुढे सरसावले. म्हातारी खूप घाबरली. पण धीर आणून म्हणाली, "खाणार तर खा बाबांनो ! मी कुठं नाही म्हणतेय ? त्यासाठीच तर गटरगुम होऊन आलेय ना ? पण आधी हे ठरवा आपापसात की प्रथम मला मारणार कोण ? कारण जो प्रथम मला मारील त्याला माझ्या मासाचा वाटा जास्त मिळेल. हो की नाही ? बरं, आणखी हेही ठरवा की माझं रक्त कोण पिणार ? मांस कोण खाणार ? हाडं आणि कातडी कोण खाणार ? आधी नीट काय ते ठरवा मग मला मारा. तोवर मी इथेच उभी राहते." लगेच, "मी मारणार, मी मारणार, पहिला घास मी घेणार". "तू काय म्हणून ? मी म्हातारीला मारणार, तिला आख्खी मीच एकटा खाणार. तुम्ही दोघंही बाजूला व्हा. म्हातारीचं मांस मी खाणार. उरलेली हाडं, रक्त आणि कातडी तुम्ही घ्या हवंतर." असं प्रत्येक जोरजोराने ओरडायला लागला. तिघांचंही मोठ्ठं भांडण लागलं. तिघेही रागारागाने डरकाळ्या फोडायला लागले. एकमेकांच्या अंगावर धावून जाऊन ओरबाडायला, चावायला लागले. या सगळ्या मारामारीच्या गडबडीत म्हातारी कधीच्या कधीच त्यांच्या नकळत गुपचूप पळून गेली, ते कुणालाच कळल नाही. तिघेही मग खजील होऊन आपापल्या घरी निघून गेले.

म्हातारी मग आपल्या पुलाखालच्या कमानीत एका मोठ्या दगडावर जाऊन धापा टाकत बसली. अमूच्या आईने खायला दिलं होतं त्यातलं थोडं तिनं खाल्लं. नदीचं पाणी प्यायली आणि थोडी विश्रांती घेऊन सार्वजनिक बागेतल्या एका बाकावर येऊन झोपली. आता तिच्याकडे भरपूर कपडे होते. अंथरूण-पांघरूण होतं. अमूच्या बाबांनी

दिलेले पैसे होते. उद्यापासून ती भीक मागणार नव्हती. कुणा कुणाच्या घरी जाऊन कामं करणार होती आणि पैसे मिळवणार होती. कुठेतरी छोटीशी खोली बघणार होती. आणि व्यवस्थित राहणार होती. आता तिची तब्येत चांगली सुधारली होती. आणि समजा, जरा आजारी पडली असती, जरा कसली काळजी वाटली असती, तरी आधाराला अमूचं घर होतंच. अमू, अमूची आई आणि अमूचे बाबा, तिघांनीही तिला आपल्या घरी केव्हाही यायला सांगितलं होतंच. तिला आता कसली काळजी नव्हती. त्या रात्री ती अगदी सुखाने झोपली.

* * *





काही वेळाने पौर्णिमेचा हसरा चांदोबा खिडकीत दिसायला लागला. अमू त्याच्याकडे बघत राहिली,



## ९. अमूचं चित्र

अमू काही दिवस आजारी होती. तिला दिवसा खूप ताप चढे आणि रात्री उतरे. म्हणून ती बरीच अशक्त झाली होती. तिला शाळेत जाता येत नव्हतं की जंगलातही हुंदडता येत नव्हतं. आपल्यां खोलीत बिछान्यात पडून पडून तिला अगदी कंटाळा आला होता. असले आळशी दिवस तिने कधीच घालवले नव्हते. अर्थात तिने शाळेतले गुरूजींनी दिलेले धडे करून ठेवले होते. तिने शाळेकडून, नातेवाईकांकडून, मित्र-मैत्रिणींकडून बक्षीस मिळालेली सगळी पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचून काढली होती आणि ती तिची आता तोंडपाठ झाली होती. अमू फार चांगली विद्यार्थिनी होती. वर्गात तिचा नेहमी पहिला नंबर असे. त्याचीच

तिला किती बक्षिसं मिळाली होती ! शिवाय उत्तम वागणूक, विविध प्रकारचं सामान्यज्ञान, तिच्या अंगात असलेल्या - चित्रकला, मूर्तिकला या कला आणि पशुपक्ष्यांच्या तिला येणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या भाषा, यामुळे ती शाळेत सर्वांत उत्तम विद्यार्थिनी म्हणून दरवर्षी निवडून येत असे. सगळे शिक्षकच तिची एकमताने निवड करीत. अमू सर्व शिक्षकांची लाडकी, आवडती मुलगी होती. पण ती अगदी साधी आणि सरळ मुलगी होती. स्वभावाने अगदी गोड आणि लाघवी ! आपल्या हुषारीबद्दल, आपल्या कलांबद्दल, आपल्या भाषांच्या ज्ञानाबद्दल, खुद्द आपल्याबद्दल तिला जराही गर्व नव्हता - फाजील अभिमान नव्हता. ती नेहमीप्रमाणेच, शांत, समाधानी, आनंदी आणि अगदी साधी सीधी होती.

एकदा कंटाळून कंटाळून तिने बसल्या बसल्या चित्र काढायला घेतलं. चित्राचा विषय अर्थातच "जंगल" ! जंगल म्हणजे तिचा अगदी जानी जानी दोस्त होतं. अगदी सुरेख चित्र काढलं तिने. मोठे मोठे वृक्ष, मागे आभाळ, खाली हिरवं हिरवं गार कुरण, कुरणांतच एक निळया निळया पाण्याचं सुंदर तळं, तळ्याभोवती सुंदर सुंदर फुलझाडं, झुडपं ! फारच सुंदर चित्र काढलं तिने. शिवाय त्या घनदाट जंगलात हरणं चरत होती. वाघ गुरगुरत होता. ससे हिरव्या कुरणात बागडत होते. मासे तळ्यातल्या पाण्यात नाचत, उसळत होते आणि एक मोठा बेडुकही एका दगडावर बसला होता. आकाशात झाडांमागें मोठा चंद्र होता. आणि जंगलभर रात्रीचं चांदणं पसरलं होतं. इतकं हुबेहूब चित्रं काढलं होतं की, सगळे प्राणी जिवंत होऊन आता हालचाल सुरु करताहेत की काय असं वाटत होतं. अमू स्वतःच्या चित्रावरच खूष झाली होती. तिला सारखं वाटत होतं की, "झाडांतून वाहणाऱ्या झऱ्यांचं गुणगुणणं, फांद्याफांद्यातून वाहताना वाऱ्याने घातलेली शीळ आणि या सगळ्या पानांची सळसळ

मी या चित्रात काढू शकले असते, तर किती बहार झाली असती !" तिने चित्राला नाव दिले - "मध्यरात्रीचं माझं जंगल"

ती अशक्त झाली होती आणि दमली होती, तरी संध्याकाळपर्यंत तिने सगळं चित्र पूर्ण केलंच. मग रात्री आईबाबांबरोबर थोडंसं जेवली आणि थकवा आल्यामुळे एकदम गाढ झोपली. झोपताना तिने आपलं चित्रं उघड्या खिडकीजवळ ठेवलं. कारण काही रंग ओले राहिले असतील तर ते खिडकीतून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळुकीने सहज सुकून जातील.

रात्री अमू अचानक जागी झाली.कारण तिला झऱ्याची झुळझुळ, वाऱ्याची शीळ आणि पानांची सळसळ ऐकू आली आणि वाघाची डरकाळीसुद्धा ! घाबरून ती उठली आणि खिडकीजवळ गेली. तर काय आश्चर्य ! चंद्राचं चांदणं खिडकीतून आत येऊन तिच्या चित्रावर पडलं होतं. आणि तिचं चित्र जिवंत झालं होतं. झाडांची पानं सळसळत होती. झरा झुळझुळ वाहत होता. मासे पाण्यात पोहत होते, उसळ्या मारीत होते, कासव हळूहळू पाण्याकडे जात होते, ससे टुणटुण उड्या मारीत होते. आणि कुरणात चरणाऱ्या हरणांवर उडी टाकण्यासाठी वाघ झेप घेऊन तयार होता. अमू एकदम ओरडली, "थांब रे वाघा, खबरदार माझ्या हरणांवर उडी मारून त्यांना ठार मारलंस आणि खाल्लंस तर ! मी बाबांना सांगेन आणि ते तुला बंदुकीने ठार मारतील. याद राख." वाघ एकदम थांबला व म्हणाला, "पण मग मी काय करू तर ? मला भयंकर भूक लागलीय. कालपासून मला काहीही खायला मिळालेलं नाहीय."

"तुम्ही सगळे इकडे खाली येऊन जमिनीवर नीट बसा पाहू ! मी सगळ्यांना खायला देते. कुणीही एकमेकांना मारायचं नाही. बिलकूल मस्ती करायची नाही."

सगळे चित्रातून पटापट उड्या मारून खाली येऊन बसले. फक्त मासे



"तुम्ही सगळे इकडे खाली येऊन जमिनीवर नीट बसा पाहू ! मी सगळ्यांना खायला देते.



तेवढे आले नाहीत. कारण पाण्याशिवाय ते कसे जगले असते? अमू स्वयंपाकघरात गेली आणि फ्रिजमध्ये, फळ्यांवरच्या डब्यांमध्ये जे जे काही होतं, ते तिने सर्वांना खायला दिलं. सशांना गाजरं, हरणांना मागीलदारचं ताजं ताजं गवत, वाघाला फ्रिजमध्ये कुत्र्यांसाठी आणून ठेवलेलं मांस, कासवासाठी कोवळी कोवळी लुसलुशीत पानं, सर्वांसाठी केक असं प्रत्येकाला तिने भरपूर खायला घातलं. मग सर्वांनी रात्रभर गप्पागोष्टी; गाणी, नाच यांचा धुडगूस घातला. वाघाने गाणं म्हटलं. सशांनी विदुषकी थाटाची नाचून मजेमजेची गाणी म्हटली. हरणांनी सुंदर नाच केला. कासवाने नाटकातली भाषणं म्हटली. खूप मजा आली. पहाटे सूर्य उगवला आणि सारीजण चित्रात जाऊन शांतपणे बसली. थकून जाऊन अमू गाढ झोपली. दुसऱ्या खिडकीतून सूर्याचे गरम आणि सोनेरी किरणे डोळ्यांवर पडल्यामुळे अमूला जाग आली. ती उठलीआणि चित्राजवळ जाऊन उभी राहिली. आणि पुन्हा आश्चर्यचकित झाली. कारण वाघ आता शांतपणे तळ्यातलं पाणी लपकलपक करून पीत होता. कासव तळ्याच्या काठी शांतपणे झोपलं होतं. हरणं खाली बसून आराम करीत होती. आणि ससे झाडांच्या खाली गवतावर नुसते लोळत होते.

"अरे! हे मी काढलेलं चित्र नाहीच मुळी! हे दुसरंच कुठलं तरी जंगल आहे. कुणी माझं चित्र बदलवलं?" अमूने आश्चर्याने म्हटलं. खिडकीतून सूर्य हसून म्हणाला, "अग, रात्री चंद्र आला होता ना, त्यांनेच तुझे सगळे रंग बदलले असणार. चित्रात फेरफार केली असणार. मोठा खटनट आहे तो. पण तू काळजी करू नकोस. हे बदललेलं चित्रसुद्धा सुंदर आहे. मला फार आवडलं." ते आता ते बदलू नकोस. आहे तसंच ठेव." अमूने हसत हसत मान डोलावली आणि ती तोंड वगैरे धुवायला स्वयंपाकघरात गेली. तर आई आश्चर्याने म्हणाली,

"अग अमू, रात्री नीट जेवली नाहीस म्हणून मध्यरात्री तुला भूक लागली का ग ? अग वेडे, काल मी केक बनवला होता, तो सगळ्याच्या सगळा खाऊन टाकलास की काय ? आणि सगळं दूध संपवलंस ? आणि कुत्र्यांसाठी आणलेलं मांस कुठाय ग बाई ? लोणी दिसत नाही, तूप दिसत नाही, खजूर नाही, शेव व चकली नाही, बर्फी नाही. अग काय केलंस तू या सर्वांचं ? फ्रिजमध्ये तुझं चॉकोलेटसुद्धा नाही. अग एकटीने सर्व खाल्लंस की काय एवढं सगळं रात्री बसून ? पोटात काहीतरी होईल ना ? पुन्हा आजारी बिजारी पडलीस तर !"

अमू जोरजोराने हसायलाच लागली आणि तिने रात्री काय काय घडलं ते सर्व आईला सांगितलं. सगळ्या जनावरांना सगळे पदार्थ कसे वाटले आणि चंद्रालासुद्धा कसा केक खायला दिला, रात्री सर्व मिळून गायले - नाचले कसे, याची सगळी गंमत तिने सांगून टाकली.

पहिल्यांदा आईचा विश्वासच बसला नाही. तिने अमूच्या खोलीत जाऊन पाहिलं तर खरंच अमूचं चित्र कालच्यापेक्षा निराळं होतं. खोलीभर गवत आणि खाण्याचे जिन्नस यांचा चुरा पडलेला होता. खाली घातलेल्या गालिच्यावर सर्वांचे लहान मोठे पायांचे ठसे उमटलेले होते. आता कुठे आईचा विश्वास बसला. अमूने जे जे सांगितलं होतं ते ते सर्व खरं होतं. आईचं मन भरून आलं. तिने अमूला जवळ घेऊन म्हटलं, "अमू, तू खरंच आम्हाला मिळालेली देवाची देणगी आहेस ग सोने ! तुझ्यावर सर्व प्राणी प्रेम करतात, तुझ्याबरोबर बोलतात, हसतात, नाचतात. खरंच कमाल आहे ! अंग चंद्र-सूर्यसुद्धा तुझ्याशी बोलतात ! किती भाग्यवान आहेस राणी तू ! आमचं नशीब थोर म्हणून तुझ्यासारखी मुलगी आम्हाला लाभली. तुला खूप मोठं आयुष्य लाभू दे- खूपखूप सुख मिळू दे" आणि तिने अमूचे मटामट मटामट पापे घेतले.

* * *





## १० . अमू आणि मासा

अमूच्या घरापासून जरा दूर एक लहानसं तळं होतं. अमू अधूनमधून तळ्यावर फेरी टाकून येत असे. तळ्यात खूप प्रकारचे लहान-मोठे मासे होते. ते दिवस-रात्र तळ्यात फिरत, उसळ्या मारत असायचे. सूर्यप्रकाशात चमचमायचे पण. अमूला पाण्यात पाय टाकून काठावरल्या दगडावर बसायला आणि माशांचे खेळ बघायला फार आवडायचं.

एकदा ती अशीच पाण्यात पाय टाकून मासे बघत बसली होती. तेव्हा तिला एक छोटंसं माशाचं पिल्लू आपल्या बाबांशी बोलताना कुरकूर करीत असलेलं दिसलं. ते रुसून म्हणत होतं, “बाबा, एकसारखं

एकसारखं याच पाण्यात फिरताना मला अगदी कंटाळा आलाय. या पाण्याबाहेर जाऊन मी एकदा हे भोवतालचं सुंदर जग बघून येऊ का ?"

"नको रे बाबा ! हे आपलं घर सोडून दुसरीकडे कुठं जायचं नाही. तू इथं आमच्यात अगदी सुरक्षित आहेस. पाण्याच्या बाहेर एक क्षणसुद्धा आपण जिवंत राहू शकत नाही, हे माहीत नाही का तुला ? वेडाच आहेस अगदी" बाबा पटकन् म्हणाले. पण माशाच्या पिल्लाने मनात ठरवलंच की एकदातरी बाहेर जाऊन यायचंच. अगदी एकट्याने जायचं.

इतक्यात एक जंगल-कामगाराचा व्रात्य मुलगा तिथे आला आणि त्याने उगीच गंमत म्हणून एक मोठ्ठा टोकेरी दगड पाण्यात फेकला. त्याला काठावर गोळा झालेल्या माशांच्या घोळक्याला हाकलवून द्यायचं होतं आणि गंमत बघायची होती. खरोखरच सर्व मासे पळाले, पण पिल्लाला मात्र दगड जोरात लागला आणि जखमी होऊन ते पाण्यातल्या पाण्यात तडफडत राहिलं. त्या मुलाला त्याची तडफड तडफड पाहून गंमत वाटली आणि त्या पिल्लाला हातात पकडून पाण्याबाहेर काढून ठार मारण्यासाठी तो पुढे आला आणि पाण्यात वाकला. त्याने त्या पिल्लाला हातात पकडलंसुद्धा; पण त्याचा दुष्टपणा पाहून अमू इतकी चिडली की ती पटकन उठली आणि त्या मुलाच्या पाठीत तिने जोराने एक धपका मारला. त्या मुलाने दचकून पटकन् ते पिल्लू पाण्यात टाकलं आणि अमूवर रागावून तो म्हणाला, "तू वाईट्ट आहेस अगदी. माझ्या सगळ्या खेळाची गंमतच तू घालवलीस. तुला काय जरूर होती मध्येमध्ये येऊन मला मारण्याची ?"

"वा ऽ रे खेळ ! याला काय खेळ म्हणतात ? तुझी झाली असती गंमत पण ते बिचारं पिल्लूं मरेल ना आता ? वाईट्ट कोण आहे तू की मी ? असले घाणेरडे दुष्ट खेळ खेळू नकोस पुन्हा" अमूपण रागावून म्हणाली.

"मी खेळणार जा ! तू काय करशील ? माझ्या बाबांकडे तक्रार करून काही उपयोग नाही. ते मला कधीही शिक्षा करणार नाहीत. मी उद्या पुन्हा येईन आणि हाच खेळ खेळेन" तो मुलगा गुरगुरून म्हणाला.

"थांब, मी माझ्या बाबांना सांगून, त्यांना तुझ्या वडिलांना सांगायला सांगते. तुझ्याविरुद्ध असले खेळ खेळतो म्हणून तक्रार करायला सांगते. म्हणजे तुझे बाबा तुला ओरडतील आणि शिक्षा देतील. त्याशिवाय तू ऐकायचा नाहीस" अमूने त्याला दम दिला. मग तो रागावून दणादणा पावलं टाकीत तिथून निघून गेला. अमूला वाटलं, "नक्कीच हा वेडा मुलगा परत येणार आणि हातातून सुटलेल्या या पिल्लाला ठार मारणार. त्यापेक्षा आपणच याला उचलून घरी न्यावे हे उत्तम. मग तिने वाळूत पडलेली एक मोठ्या तोंडाची बाटली उचलली आणि पाण्यासकट ते जखमी व अर्धमेलं पिल्लू बाटलीत पकडलं आणि घरी आणलं. आईबाबांच्या मदतीने औषधोपचार करून, त्याची खूप काळजी घेऊन तिने त्या पिल्लाला मरता मरता वाचवलं आणि बरंही केलं.

काही दिवसांतच पिल्लू वाढलं आणि बाटलीत मावेनासं झालं. मग अमूने काचेची मोठी बरणी घेतली आणि त्यात त्या पिल्लाला ठेवलं. त्याच्या खाण्यापिण्याची ती व्यवस्थित काळजी घेत होती म्हणून पिल्लू भराभर मोठं होऊ लागलं. त्याला इथे तिथे फिरायला बरणीही पुरेनाशी झाली. म्हणून अमुने त्याला बरणीतून काढून काचेच्या टँकमध्ये ठेवलं. काही दिवसांनी टँकही अपुरा पडायला लागला, इतका मोठा मासा त्या पिल्लाचा होऊन बसला. अखेर अमूच्या बाबांनी एक प्लास्टिकचा मोठा टँक आणला. तो पाण्याने संपूर्ण भरला आणि माशाला आत सोडला. अमू त्याचे पाण्यातले खेळ बघत तासन्तास बसून राही. तिला त्याचं वेडच लागलं. ती त्याच्यासाठी नुसता जीव टाकायची. त्याचं पाण्यातलं पोहोणं, उसळ्या घेणं, गोलगोल फिरत राहणं बघायला तिला फार

आवडायचं, त्याच्या चपळ हालचाली तर इतक्या आवडायच्या की बस्स !

पण एक दिवस तिने त्याला रडताना पाहिलं. स्वतःशीच दुःख करताना ऐकलं. तो आपल्या आईवडिलांपासून, भावंडांपासून, मित्रांपासून दूर झाला होता म्हणून त्याला फार दुःख होत होतं. इथे त्याचे सर्वप्रकारचे लाड होत होते, तो सुखात होता, पण तो बिचारा एकटाच पडला होता म्हणून मनातून तो झुरत होता. अमूला त्याचं दुःख कळलं. तिने बाबांना सांगितलं, "बाबा हा मनातल्या मनात झुरतोय. हल्ली जास्त खात-पीत नाही. याला याच्या भाऊबंदांत नेऊन सोडलं पाहिजे, म्हणजेच त्याला बरं वाटेल. जन्मभर याला आपण आपल्याकडेच कसं अडकवून ठेवायचं ! तळ्यातच तो सुखी होईल."

मग बाबांनी एक छोटा ट्रक मागवला. त्यावर माशासकट तो प्लास्टिक टँक चढवला आणि तळ्याकडे नेऊन मोठ्या प्रयत्नाने माशाला तळ्यात सोडून दिलं. त्याच्या आईबाबांनी, त्याच्या भावंडांनी प्रथम त्याला ओळखलंच नाही. कारण अमूच्या घरी मस्त खाऊन-पिऊन तो खूप मोठा झाला होता, तगडा बनला होता. त्याची सोनेरी कातडी अगदी झळाळत होती. त्याच्या एवढी सुंदर वाढ कुणाचीच झाली नव्हती. त्याला अमूने घरी नेला तेव्हा सर्वांना वाटलं होतं की, त्याला बहुतेक मोठ्या माशाने गिळलं असणार किंवा कशात तरी अडकून तो तडफडून मेला असणार ! पण आता बघतात तर तो जिवंत होता आणि मस्त वाढलेला होता आणि सुंदर दिसत होता. गळ्यात गळे घालून सर्वांनी त्याला मिठी मारली, त्याचे मुके घेतले आणि गप्पागोष्टींना सुरुवात केली. त्यांच्या घरी अगदी आनंदी आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी अमू आपल्या माशाला भेटण्यासाठी तळ्यावर आली आणि नेहमीसारखी पाण्यात पाय टाकून बसली, तर माशाचे



दुसऱ्या दिवशी अमू आपल्या माशाला भेटण्यासाठी तळ्यावर आली आणि

BVBK-0402959

आईबाबा, भावंडं, मित्रमंडळी सर्व अमूच्या पायापाशी जमले. तिच्या पायांचे एकामागून एक मुके घेऊन, आपल्या भावाला वाचवल्याबद्दल सर्वांनी तिचे आभार मानले. पण अमूचा मासा त्यांच्यात नव्हताच. अमूला तर त्यालाच भेटायचं होतं. त्याची खुशाली विचारायची होती, पण तो खूप उशीरा आला. सगळे निघून गेल्यावर सुळदिशी तो कुठून तरी उसळी घेऊन आला. येताना तोंडात पकडून एक मोठा शिंपला त्याने आणला होता. तो अलगद तिच्या पायांवर ठेवून आणि तिच्या पायांचा मुका घेऊन तो म्हणाला, "अमू, केवळ तू होतीस म्हणून माझा जीव वाचला. तू माझी काळजी घेतलीस म्हणून मी एवढा मोठा झालो. बघ तुझ्यासाठी मी ही छोटीशी भेट आणली आहे. नाही म्हणू नकोस. कुठून कुठून लांबून मी शोधून आणलीय. कृपा करून घरी घेऊन जा. तुझ्याबद्दल मला वाटणाऱ्या आदराची, प्रेमाची खूण म्हणून तू ही भेट जपून ठेव." बिचारा मासा पाण्यातच घळघळून रडायला लागला. एकसारखे तिच्या मऊ लुसलुशीत पावलांचे मुके घ्यायला लागला. मग अमू तो शिंपला घेऊन घरी आली आणि तिने तो टेबलावर ठेवला. आतापर्यंत तिने इतके शंख, शिंपले जमविले होते की, या शिंपल्याला आता कुठे ठेवायचं हाच तिला प्रश्न पडला. दोन-तीन दिवस शिंपला टेबलावरच पडून राहिला. एकदा अमूची आई टेबल साफ करायला गेली आणि चुकून तो शिंपला तिच्या हातून खाली जमिनीवर पडला आणि खळकन् फुटला. त्याचे सरळ दोन तुकडेच झाले. ते उचलून फेकायला म्हणून आई टेबलाखाली वाकली तर काय आश्चर्य ! त्या शिंपल्यातून एक मोठा चमकदार, गुलाबी गुलाबी, गोल गोल मोती बाहेर येऊन जमिनीवर पडलेला ! आईला खूप आनंद झाला. तो एक खूप किमती, अतिशय दुर्मिळ जातीचा असा मोती होता. प्रथम तिच्या मनात आलं, "हा मोती नेऊन गावातल्या जवाहिऱ्याकडे विकावा. त्याचे खूप पैसे

येतील. ते आपण खर्चून टाकायचे नाहीत मौजमजा करण्यासाठी ! तर म्हातारपणी आधार होईल म्हणून साठवूनच ठेवायचे - कशात तरी गुंतवायचे; नाहीतर बँकेत ठेवायचे म्हणजे त्याचं व्याज येईल आणि रक्कम वाढेल." पण मग तिला आपल्या स्वार्थीपणाची लाज वाटली. ती पुन्हा मनात म्हणाली, "खरं तर मोत्याची ही भेट, अमूला, आपल्या प्रेमाखातर, आदरापोटी माशाने अगदी मनापासून दिलेली. आपण ही भेट कशी विकू शकतो ? खरं तर या मोत्यावर हक्क आपल्या अमूचा. तिला विचारल्याशिवाय आपण या मोत्याचं काहीही करू शकत नाही. तिलाच तो दिला पाहिजे."

अमू शाळेतून घरी आल्यावर आईने तो मोती अमूच्या हातावर ठेवला आणि काय घडलं तें सांगितलं. अमू इतकी लहान पण किती समजूतदार होती ती ! आईवर तिचं किती प्रेम ! ती म्हणाली, "आई, तुझ्या अंगावर कोणतेच दागिने नाहीत ग ! या मोत्याची अंगठी करून घे आणि तूच ती तुझ्या बोटात घालून वापर. म्हणजे आपल्या सर्वांना ती रोजच्या रोज दिसेल आणि आपल्या गुणी व प्रेमळ माशाची सर्वांना आठवण येत राहील. म्हणजे आपण कधी त्याला विसरणार नाही."

खरोखरच माणसं कधी कधी केलेले उपकार विसरतात पण असे क्षुल्लक लहानसहान प्राणी कधी ते विसरत नाहीत. ते शेवटपर्यंत त्यांच्यावर केलेल्या उपकारांची आठवण ठेवतात. अमूच्या आईने त्या सुंदर मोत्याची अंगठी केली आणि एकदा-दोनदा अमूच्या आग्रहासाठी घातलीसुद्धा. पण अमूच्या लग्नात अहेर म्हणून अमूला घालण्यासाठी तिने ती कपाटात जपून ठेवली आहे.

* * *

पुढील कथा पुढील भागामध्ये वाचा

आला.
२९५९

